Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे



"वेड्यांच्या हातात अण्वस्त्रे देऊ शकत नाही!"
(पान २ वर)

।रविवार, दि. ३ मे २०२६। वर्ष १ ।अंक २८ ।पाने २। DIGITAL EDITION

## Selected

### 4 वर्षीय बालिकेवर अत्याचार, हत्या

पुणे: एका ४ वर्षांच्या चिमुरडीवर बलात्कार करून तिची हत्या केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. याप्रकरणी ६५ वर्षीय आरोपीला पोलिसांनी अटक केली असून, मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे.

### भारताला लवकरच मिळणार हायपरसोनिक क्षेपणास्त्रे

नवी दिल्ली: भारतीय संरक्षण दलाच्या ताफ्यात लवकरच हायपरसोनिक क्षेपणास्त्रांचा समावेश होणार आहे. या क्षेपणास्त्रांचा वेग सध्याच्या 'ब्रह्मोस' सुपरसोनिक क्षेपणास्त्रांपेक्षा दुप्पट असेल. अत्यंत वेगवान गती आणि प्रगत तंत्रज्ञानामुळे जगातील कोणतीही सध्याची 'डिफेंस सिस्टम' हे क्षेपणास्त्र रोखू शकणार नाही, असा दावा केला जात आहे. यामुळे भारताची सामरिक शक्ती जागतिक स्तरावर अधिक प्रबळ होणार आहे.

## ४३ कोटींच्या कथित गैरव्यवहारावर गुन्हा; EOW तपासामुळे राजकीय-प्रशासकीय वर्तुळात खळबळ

# जळगाव हादरले: 'ॲटलांटा' घोटाळ्याला फौजदारी वळण!

## मुख्यमंत्र्यांच्या निर्देशांनंतर कारवाई वेगात • दोन दशकांनंतर प्रकरणाला निर्णायक कलाटणी

करण (गुरु) शिंदे
जन सम्राट टाईम्स

जळगाव | जळगाव महानगरपालिकेशी संबंधित 'ॲटलांटा कन्स्ट्रक्शन' प्रकरणाने अखेर गंभीर फौजदारी वळण घेतले असून, तब्बल ४३ कोटी रुपयांच्या कथित आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून न्यायालयीन आणि राजकीय पातळीवर चर्चेत असलेले हे प्रकरण आता थेट आर्थिक गुन्हे शाखा (EOW) कडे गेल्याने संपूर्ण उत्तर महाराष्ट्राचे लक्ष या तपासाकडे लागले आहे.

१९९७ ते २००६ या कालावधीत शहरातील रस्ते व इतर विकासकामांसाठी ॲटलांटा कन्स्ट्रक्शन कंपनीला मोठी कंत्राटे देण्यात आली होती. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या नावाखाली कामे हाती घेण्यात आली; मात्र कालांतराने कामांची गुणवत्ता, वेळेत पूर्तता आणि निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले. महापालिकेच्या तक्रारीनुसार, अपूर्ण कामे करूनही मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ घेतला गेला. यातून व्याज, दंड आणि अतिरिक्त खर्चामुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप आहे.

**कोणावर गुन्हा दाखल?**

जळगाव शहर पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधानाच्या कलम





४०६, ४०९ आणि ४२० अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. यामध्ये: ॲटलांटा कन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लिमिटेड संचालक राझू अंबालाल वावरोट इतर संबंधित अधिकारी व संचालक यांचा समावेश आहे. फिर्याद महापालिकेचे प्रभारी शहर अभियंता योगेश बोरोले यांनी दिली आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर हालचालींना वेग**

या प्रकरणाला निर्णायक गती मिळण्यामागे राजकीय पातळीवरील पाठपुरावा महत्त्वाचा ठरला. स्थानिक स्तरावर सातत्याने आवाज उठल्यानंतर प्रकरण थेट मुख्यमंत्री स्तरावर पोहोचले. त्यानंतर संबंधित प्रशासनाला तातडीने गुन्हा दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आणि काही दिवसांतच कारवाई पूर्ण झाली. या प्रकरणात यापूर्वी न्यायालयीन लढाईही रंगली होती. काही आदेशांनंतर महापालिकेला कंपनीच्या नावाने मोठी रक्कम जमा करावी लागल्याचे समोर आले होते. दरम्यान, काही हस्तक्षेप याचिका न्यायालयाने फेटाळल्या होत्या, ज्यामुळे या प्रकरणावर राजकीय रंगही चढला होता. आता सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे आर्थिक गुन्हे शाखेचा तपास. यात पुढील मुद्द्यांवर लक्ष केंद्रित होण्याची शक्यता आहे:

निधी मंजुरी व वापरात संगनमत होते का?
कामाच्या दर्जात व मोजमापात तफावत होती का?
साखळी सक्रिय होती का?

### नागरिकांचा संताप उफाळला

या प्रकरणामुळे जळगावकरांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. अनेक वर्षे खराब रस्ते, अपूर्ण कामे आणि विकासाच्या नावाखाली झालेल्या त्रासामुळे नागरिक आता थेट सवाल करत आहेत — "जनतेच्या कराच्या पैशांचा हिशोब कोण देणार?"

### व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह

'ॲटलांटा प्रकरण' हे केवळ एका कंपनीपुरते मर्यादित नसून संपूर्ण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.
सार्वजनिक निधीची सुरक्षितता प्रशासनाची जबाबदारी
ठेकेदारी प्रक्रियेतील पारदर्शकता आणि राजकीय इच्छाशक्ती
या सर्व बाबींची कसोटी आता लागणार आहे.
आता सर्वांचे लक्ष तपासाकडे या प्रकरणात पुढे काय घडते, EOW च्या तपासातून किती मोठे खुलासे होतात आणि जबाबदारांवर कारवाई होते का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

जर आरोप सिद्ध झाले, तर हा घोटाळा उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या नागरी आर्थिक गैरव्यवहारांपैकी एक ठरू शकतो.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# "सर्व भारतीयांचे डीएनए महादेवाशी जोडलेले!

## जामिया कुलगुरूंच्या विधानाने गदारोळ

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली** : जामिया मिलिया इस्लामिया (जेएमआय) विद्यापीठाचे कुलगुरू मजहर आसिफ यांनी केलेल्या एका विधानामुळे सध्या वादाचे वादळ निर्माण झाले आहे. "भारतातील सर्व नागरिकांचे डीएनए हे महादेवाशी जोडलेले आहेत," असे विधान त्यांनी एका कार्यक्रमात केले. या विधानानंतर विद्यापीठ परिसरात तणावाचे वातावरण असून विविध संघटनांकडून त्यांचा तीव्र निषेध केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कुलगुरू मजहर आसिफ एका चर्चासत्रात बोलत होते. यावेळी भारतीय संस्कृती आणि वारसा यावर भाष्य करताना त्यांनी महादेव व भारतीय नागरिकांचे डीएनए याबाबत विधाने केली. यानंतर आता वातावरण तापले आहे. मजहर आसिफ यांना वाढत्या विरोधामुळे विद्यापीठ प्रशासनावर दबाव निर्माण झाला आहे. अद्याप कुलगुरू कार्यालयाकडून या वादावर कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण किंवा माफीनामा प्रसिद्ध करण्यात आलेला नाही. मात्र, या विधानामुळे आगामी काळात जामियातील शैक्षणिक वातावरण अधिक तापण्याची शक्यता वर्तवली जात आहे.





### आसिफ विधानातील महत्त्वाचे मुद्दे असे -

* डीएनएचा संबंध: "भारतातील प्रत्येक व्यक्तीचे पूर्वज एकच आहेत.जर आपण सखोल अभ्यास केला, तर प्रत्येक भारतीयाचा डीएनए हा महादेवाशी जोडलेला असल्याचे दिसून येईल."
* सांस्कृतिक एकात्मता: मजहर आसिफ यांनी आपल्या भाषणात भारतीयत्वाचा दाखला देताना सर्वांची मुळे एकच असल्याचे ठासून सांगितले. कुलगुरूंच्या या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच जामिया मिलिया इस्लामियाच्या कॅम्पसमध्ये आंदोलनाचे पडसाद उमटले.

हे विधान असंवैधानिक असून शैक्षणिक संस्थेच्या धर्मनिरपेक्ष प्रतिमेला धक्का लावणारे आहे, असा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे.

### मुंबईत भीषण दुर्घटना: क्रेन कोसळून २ कामगारांचा मृत्यू

**मुंबई | प्रतिनिधी** : मुंबईत सुरू असलेल्या महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पावर भीषण अपघात घडला असून क्रेन कोसळल्याने दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. दहिसर-भयंदर लिंक रोड (DBLR) प्रकल्पाच्या कास्टिंग यार्डमध्ये ही घटना घडली असून, या दुर्घटनेने कामगार सुरक्षेच्या प्रश्नावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. प्राथमिक माहितीनुसार, हा अपघात Larsen & Toubro (एल अँड टी) यांच्या साइटवर घडला. काम सुरू असताना अचानक क्रेन कोसळल्याने तेथे काम करणारे दोन कामगार त्याखाली अडकले. अपघात इतका भीषण होता की दोघांचाही जागीच मृत्यू झाला.

# पुण्यात इंटक पदनियुक्ती कार्यक्रम उत्साहात!

## कामगारांच्या हक्कासाठी संघटनेत सहभागी होण्याचे आवाहन

शंकर जोग
जन सम्राट टाईम्स

**पुणे ।** भारतीय राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) पुणे जिल्ह्याच्या वतीने आयोजित पदनियुक्ती पत्र वाटप कार्यक्रम डेक्कन येथील हॉटेल रविराज येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विविध पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाला इंटकचे प्रदेशाध्यक्ष ॲड. सुभाष माछरे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पुणे शहराध्यक्ष इमरान शेख, जिल्हा महिला अध्यक्षा सुवर्ण माने, शहर महिला अध्यक्षा मुमताज शेख, जिल्हा कार्याध्यक्ष



आलिशा बुद्धिवंत, उपाध्यक्ष रेखा माने, सचिव मेघा शेगर, प्रभाग अध्यक्ष अविनाश कसबे यांसह अनेक पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. यावेळी बोलताना ॲड. माछरे यांनी कामगारांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या इंटक संघटनेत कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. "कामगारांना न्याय मिळवून देणे, त्यांच्या समस्या सोडवणे आणि त्यांच्या सन्मानासाठी लढणे हे इंटकचे प्रमुख ध्येय आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

इंटकच्या माध्यमातून राज्यभरात कामगारांच्या विविध प्रश्नांवर सक्रियपणे काम केले जात असून, प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी संघटना प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन पुणे जिल्हाध्यक्ष ॲड. धनंजय बुद्धिवंत यांनी केले. यावेळी प्रदेश महासचिव शिवाजीराव म्हस्के, शिवाजीराव गायकवाड, सचिव प्रकाश घोळवे, सुवर्णा माने यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# नेट परीक्षेच्या नियमात ऐतिहासिक बदल; आता ४ वर्षांच्या पदवीधरांनाही संधी

जन सम्राट टाईम्स

**पुणे | विशेष प्रतिनिधी:** विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) मार्फत घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (नेट) मध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. युजीसीने नियमांत ऐतिहासिक बदल करत, ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम (फोर-इअर अंडरग्रॅज्युएट प्रोग्रॅम - एफवाययुपी) पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना थेट युजीसी-नेट परीक्षा देण्याची आणि पीएचडी प्रवेश मिळवण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. युजीसीने देशभरातील विद्यार्थ्यांसाठी हा एक अत्यंत क्रांतिकारी बदल लागू केला आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांची ४ वर्षांची पदवी पूर्ण झाली आहे किंवा जे अंतिम सत्रात आहेत, त्यांच्यासाठी नेट परीक्षा आणि संशोधनाचा मार्ग आता थेट खुला झाला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष प्रा. एम. जगदीश कुमार यांनी अधिकृतरीत्या परिपत्रक काढून आणि त्यांच्या अधिकृत 'एक्स' (ट्विटर) खात्यावरून या बदलांची घोषणा केली होती. हे बदल केंद्र सरकारच्या 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' (एनईपी २०२०) च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार लागू करण्यात आले आहेत. या नव्या बदलांतील मुख्य वैशिष्ट्य म्हणजे,



मास्टर्स पदवीची (पीजी) अट शिथिल करण्यात आली आहे. यापूर्वी युजीसी-नेट परीक्षा देण्यासाठी आणि पीएचडी. करण्यासाठी उमेदवाराकडे पदव्युत्तर पदवी (मास्टर्स डिग्री) असणे अनिवार्य होते. मात्र, नवीन नियमानुसार आता ४ वर्षांची पदवी (८ सेमिस्टर्स) पूर्ण केलेले विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणाशिवाय थेट नेट परीक्षा देऊ शकतील. ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी आता कोणत्याही विषयातून युजीसी-नेट परीक्षा देऊ शकतात. त्यांनी पदवीला जो मुख्य विषय घेतला होता, त्याच विषयात परीक्षा देणे आता बंधनकारक राहिलेले नाही. ते ज्या विषयात पीएचडी करू इच्छितात, तो विषय निवडू शकतात. युजीसी ने घेतलेल्या आणखी एका मोठ्या निर्णयानुसार, आता वेगवेगळ्या विद्यापीठांना पीएचडी प्रवेशासाठी स्वतःच्या स्वतंत्र प्रवेश परीक्षा घेण्याची गरज नाही. युजीसी-नेट च्या गुणांवरूनच उमेदवारांना पीएचडी प्रवेश दिला जाणार आहे. हा नेट स्कोअर पीएचडी प्रवेशासाठी एक वर्षापर्यंत ग्राह्य धरला जाईल.

### पात्रतेसाठी गुणांची अट

ज्या उमेदवारांना त्यांच्या ४ वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमात किमान ७५% गुण (किंवा समतुल्य ग्रेड) मिळाले आहेत, ते थेट पीएचडी आणि नेट साठी पात्र ठरतील. एससी, एसटी, ओबीसी (नॉन-क्रिमी लेयर), दिव्यांग आणि ईडब्ल्यूएस प्रवर्गातील उमेदवारांसाठी या गुणांमध्ये ५ टक्क्यांची (म्हणजेच ७०% ची अट) सवलत देण्यात आली आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# 50 हजार रुपयांची लाच घेताना ग्रामपंचायत अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

## १२ लाखांच्या विकासकामांच्या बिलासाठी मागितले होते '७ टक्के कमिशन'

करण शिंदे
जन सम्राट टाईम्स

**जळगाव ।** अमळनेर तालुक्यातील ग्रामपंचायत स्तरावरील भ्रष्टाचाराचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, १२ लाख रुपयांच्या विकासकामांच्या बिलासाठी तब्बल '७ टक्के कमिशन' मागणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्याला जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे.

या कारवाईमुळे अमळनेर तालुक्यासह जिल्हाभरात मोठी खळबळ उडाली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नगाव बु. (ता. अमळनेर) येथील ग्रामपंचायत अधिकारी रविंद्र देविदास पवार (वय ४८) यांनी १५ व्या वित्त आयोगांतर्गत मंजूर विकासकामांच्या बिलासाठी तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली होती. तक्रारदाराच्या चुलत भावाला आरसीसी गटार बांधकाम आणि पेव्हर ब्लॉक बसविण्याची सुमारे १२ लाख रुपयांची दोन कामे मिळाली होती. या कामांचे बिल मंजूर करून देण्यासाठी आरोपी अधिकाऱ्याने एकूण रकमेच्या ७ टक्के प्रमाणे ₹८४ हजारांची मागणी केल्याचे समोर आले. विशेष म्हणजे, आरोपीने यापूर्वीच ₹१३ हजार रुपये ऑनलाइन फोन-पे द्वारे स्वीकारल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. उर्वरित रकमेवर तडजोड करत अखेर ₹५० हजार रुपये स्वीकारण्याचे ठरले. दरम्यान, तक्रारदाराने याबाबत ३० एप्रिल रोजी जळगाव लाचलुचपत



प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर एसीबीने पंचांसमक्ष सापळा रचला. अमळनेर शहरातील केलेनगर परिसरातील आरोपीच्या राहत्या घरी ही कारवाई करण्यात आली.

आरोपी रविंद्र पवार हे स्वतःच्या घरातच ₹५० हजारांची लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात अडकले. या प्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ग्रामपंचायत स्तरावर विकासकामांच्या बिलांसाठी कमिशन मागितले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असताना, या कारवाईने पुन्हा एकदा "टक्केवारीच्या खेळा"वर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

ग्रामीण भागातील विकासकामांमध्ये अधिकारी आणि ठेकेदार यांच्यातील आर्थिक व्यवहारांबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक भारत तागंडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी, सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस उपअधीक्षक योगेश ठाकूर यांच्या पर्यवेक्षणाखाली पोलीस निरीक्षक हेमंत नागरे, स्मिता नवघरे आणि त्यांच्या पथकाने सापळा यशस्वीपणे रचला. या कारवाईनंतर जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये एकच खळबळ उडाली असून, "आता एसीबीची नजर गावपातळीवरील भ्रष्टाचारावरही आहे," अशी चर्चा रंगू लागली आहे.


### अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

आरोपीने यापूर्वीच ₹१३ हजार रुपये ऑनलाइन फोन-पे द्वारे स्वीकारल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. उर्वरित रकमेवर तडजोड करत अखेर ₹५० हजार रुपये स्वीकारण्याचे ठरले. दरम्यान, तक्रारदाराने याबाबत ३० एप्रिल रोजी जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर एसीबीने पंचांसमक्ष सापळा रचला. अमळनेर शहरातील केलेनगर परिसरातील आरोपीच्या राहत्या घरी ही कारवाई करण्यात आली. आरोपी रविंद्र पवार हे स्वतःच्या घरातच ₹५० हजारांची लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात अडकले. या प्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'आशिकी' फेम सुपरस्टार राहुल रॉय आर्थिक तंगीत!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई |** १९९० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आशिकी' या चित्रपटातून रातोरात सुपरस्टार बनलेला अभिनेता राहुल रॉय सध्या अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहे. एकेकाळी लाखो दिलांची धडकन असलेल्या या अभिनेत्याने आता जाहीरपणे आपल्या आर्थिक तंगीबद्दल भाष्य केले असून मदतीसाठी साद घातली आहे. प्रकृती अस्वास्थ्य आणि कामाचा अभाव यामुळे त्यांच्यावर ही वेळ ओढवली आहे. ब्रेन स्ट्रोक आणि आरोग्याच्या अनेक समस्यांनी राहुलला ग्रासले आहे. राहुल रॉय यांच्या संघर्षाची सुरुवात प्रामुख्याने २०२० मध्ये झाली. कारगिलमध्ये एका चित्रपटाचे शूटिंग करत असताना त्यांना 'ब्रेन स्ट्रोक' आला होता. या गंभीर आजारानंतर त्यांना दीर्घकाळ रुग्णालयात राहावे लागले. उपचारानंतर त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली असली तरी, या आजारामुळे त्यांच्या करिअरवर आणि आर्थिक स्थितीवर मोठा परिणाम



झाला. बोलण्यातील अडथळे आणि शारीरिक मर्यादांमुळे त्यांना पूर्वीसारखे काम मिळवणे कठीण झाले आहे. राहुल रॉय सध्या मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. त्यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही ठोस साधन उरलेले नाही. "मला काम द्या, मला मदतीची गरज आहे," अशा शब्दांत त्यांनी आपली व्यथा मांडली आहे. चित्रपट सृष्टीतील ओळखीच्या लोकांनी आणि चाहत्यांनी आपल्याला पाठिंबा द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. सध्या राहुल रॉय इन्स्टाग्रामवर सक्रिय असून ते विविध रील्स शेअर करत असतात. मात्र, यावरून त्यांना मोठ्या प्रमाणावर ट्रोलिंगचा सामना करावा लागत आहे. "एकेकाळचा सुपरस्टार आता अशा प्रकारचे व्हिडिओ का बनवतोय?" अशा कमेंट्स युजर्सकडून केल्या जात आहेत.

» Selected

## पृथ्वीवर दिवसाही होणार अंधार!



**नवी दिल्ली :** खगोलप्रेमी आणि वैज्ञानिकांसाठी एक अत्यंत रोमांचक आणि ऐतिहासिक घटना लवकरच घडणार आहे. या शतकातील सर्वात मोठे आणि प्रदीर्घ काळ चालणारे सूर्यग्रहण निश्चित झाले असून, यामुळे तब्बल ६ मिनिटांहून अधिक काळ दिवसाचे रूपांतर चक्क रात्रीत होणार आहे. या अद्भुत खगोलीय घटनेनंतर अशा प्रकारचे दीर्घ खग्रास ग्रहण पाहण्यासाठी मानवजातीला पुढील १५७ वर्षे प्रतीक्षा करावी लागणार आहे. खग्रास सूर्यग्रहणाच्या वेळी पृथ्वी, चंद्र आणि सूर्य एका सरळ रेषेत येतात. या प्रक्रियेत चंद्र सूर्याला पूर्णपणे झाकून टाकतो.

## दिल्लीमध्ये 30 वर्षीय न्यायाधीशांची आत्महत्या

**नवी दिल्ली :** दक्षिण दिल्लीतील सफदरजंग एन्क्लेव्ह (ग्रीन पार्क) परिसरात दिल्ली न्यायिक सेवेतील ३० वर्षीय न्यायाधीश अमन कुमार शर्मा यांनी राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शनिवारी उघडकीस आली. शर्मा यांचा मृतदेह त्यांच्या घरातील पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळला. त्यांचे मेहुणे शिवम यांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता, असे डॉक्टरांनी घोषित केले.

### “राग नव्हे, असहायतेची प्रतिक्रिया”; घटनेमागची पार्श्वभूमी सांगत राजकारणाला नकार

# ट्रॅफिक जामवरून ‘ती’ महिला चर्चेत!

### टीना चौधरींची स्पष्ट भूमिका समोर;“दीड तास विनंती करूनही प्रतिसाद नाही”

जन सम्राट टाईम्स

**पुणे ।** काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओत वाहतूक कोंडीवरून संताप व्यक्त करत थेट गिरीश महाजन यांना जाब विचारणारी महिला म्हणून चर्चेत आलेल्या टीना चौधरी यांनी अखेर स्वतः पुढे येत संपूर्ण प्रकरणावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. “माझ्या सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त करणाऱ्यांचे आभार; मात्र मी आक्रमक का झाले, हे समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे,” असे त्या म्हणाल्या. घटना नेमकी काय घडली? २१ एप्रिल रोजी दुपारी सुमारे ४.४५ वाजता टीना चौधरी आपल्या मुलीला म्युझिक क्लासमधून आणण्यासाठी निघाल्या होत्या. मात्र, वाटेतच त्या प्रचंड वाहतूक कोंडीत अडकल्या. सुमारे २५ मिनिटे गाडीत बसूनही परिस्थिती न बदलल्याने त्यांनी गाडीतून उतरून नेमका अडथळा काय आहे, हे पाहण्याचा निर्णय घेतला. टीनांच्या मते, रस्त्यावर दोन मोठ्या बस उभ्या असल्याने संपूर्ण वाहतूक ठप्प झाली होती. “मी जवळपास दीड तास तेथे उपस्थित असलेल्या पोलिसांकडे विनंती करत होते. मात्र कुणीही ठोस कारवाई



केली नाही. अखेर लक्ष वेधण्यासाठी मी पाण्याची बाटली खाली फेकली,” असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या कृतीमागे उद्देश फक्त प्रशासनाचे लक्ष वेधणे हाच होता, असेही त्यांनी नमूद केले. लष्करी पार्श्वभूमी; वर्दीबद्दल आदर आपल्या कुटुंबाचा लष्करी वारसा सांगताना टीना भावूक झाल्या. “माझे आजोबा आणि वडील सैन्यात होते, वडिलांनी दोन युद्धे लढली आहेत. आमच्या कुटुंबातील अनेक जण देशसेवेत आहेत. त्यामुळे मला वर्दीचा पूर्ण आदर आहे,” असे त्या म्हणाल्या. मात्र, “वर्दी घातली म्हणजे लोकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार मिळत नाही,” अशा शब्दांत त्यांनी पोलिसांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. घटनेच्या वेळी सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास मंत्री गिरीश महाजन यांची रॅली त्या मार्गावरून जात होती. “त्या ठिकाणी अनेक लोक होते, पण केवळ महाजन यांनी माझे म्हणणे ऐकले. त्यांच्या सूचनेनंतरच बस बाजूला करण्यात आल्या आणि रस्ता मोकळा झाला,” असे टीना यांनी सांगितले.

### “माझ्या नावावर राजकारण करू नका”

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर काही ठिकाणी या घटनेला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून आले. त्यावर टीना यांनी ठाम भूमिका घेतली. “माझ्या खांद्यावर बंदूक ठेवून कोणीही राजकारण करू नये. सर्वच पक्ष सामान्य लोकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष करतात. स्वतःचा आवाज उठवावा,” असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी, प्रशासनाचा प्रतिसाद आणि नागरिकांचा वाढता संताप पुन्हा एकदा समोर आला आहे. सोशल मीडियावर अनेकांनी टीनांच्या धाडसाचे समर्थन केले, तर काहींनी त्यांच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तज्ज्ञांच्या मते, ही घटना केवळ एका व्यक्तीच्या संतापाची नसून, शहरी भागातील वाहतूक कोंडी आणि व्यवस्थापनातील त्रुटींचे प्रतिबिंब आहे. वेळीच उपाययोजना न झाल्यास अशा घटना पुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# ईपीएफओने केला बदल : नोकरी बदलताच पीएफ ट्रान्सफरचे टेन्शन मिटले!

### 'ईपीएफओ'चा 'मास्टरस्ट्रोक'; कोट्यवधी कर्मचाऱ्यांना मिळणार मोठा दिलासा

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने (ईपीएफओ) खासगी क्षेत्रातील नोकरी करणाऱ्या कोट्यवधी कर्मचाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी दिली आहे. ईपीएफओने आपल्या नियमात आणि कार्यप्रणालीत मोठा बदल केला असून, त्याला 'मास्टरस्ट्रोक' मानले जात आहे. या नवीन सुविधेमुळे आता नोकरी बदलल्यानंतर पीएफ ट्रान्सफर करण्यासाठी कर्मचाऱ्यांना करावी लागणारी धावपळ थांबणार आहे. ईपीएफओने आता 'ऑटोमॅटिक पीएफ ट्रान्सफर' ही सुविधा अधिक प्रभावीपणे लागू केली आहे. या अंतर्गत, जेव्हा एखादा कर्मचारी आपली जुनी नोकरी सोडून नवीन कंपनीत रुजू होतो, तेव्हा त्याचा जुन्या कंपनीतील पीएफ बॅलन्स आपोआप नवीन कंपनीच्या खात्यात वर्ग केला जाईल. यासाठी कर्मचाऱ्याला कोणताही 'फॉर्म १३' भरण्याची किंवा मॅन्युअली अर्ज करण्याची गरज उरणार नाही.

**नव्या सुविधेचे मुख्य फायदे**

वेळेची बचत: पूर्वी पीएफ ट्रान्सफर करण्यासाठी अनेक महिने लागायचे, आता ही प्रक्रिया स्वयंचलित झाल्यामुळे कर्मचाऱ्यांचा वेळ वाचणार आहे. * मॅन्युअल अर्जातून सुटका: कर्मचाऱ्यांना आता त्यांच्या जुन्या कंपनीच्या किंवा ईपीएफओ कार्यालयाच्या चकरा मारण्याची गरज नाही. * व्याजाचे नुकसान टळणार: पीएफ ट्रान्सफर वेळेवर न झाल्यामुळे अनेकदा व्याजाच्या हिशोबात गुंतागुंत निर्माण व्हायची, ती आता दूर होईल. * पारदर्शकता: संपूर्ण प्रक्रिया डिजिटल आणि स्वयंचलित असल्याने यामध्ये मानवी हस्तक्षेप कमी होईल आणि पारदर्शकता वाढेल. कसे काम करेल हे तंत्रज्ञान? ही सुविधा कर्मचाऱ्याच्या युनिव्हर्सल अकाऊंट नंबर (युएएन) वर आधारित आहे. जोपर्यंत कर्मचाऱ्याचा युएएन आधारशी लिंक आहे आणि त्याचे केवायसी पूर्ण आहे, तोपर्यंत नोकरी बदलताच नवीन कंपनीने पीएफमध्ये नोंदणी केल्यावर जुना निधी आपोआप ट्रान्सफर होईल. या निर्णयामुळे ईपीएफओच्या कामकाजात सुसूत्रता येईल. कोट्यवधी नोकरदार वर्गासाठी ही अत्यंत महत्त्वाची सुविधा आहे, कारण अनेकदा तांत्रिक अडचणींमुळे कर्मचाऱ्यांचे पैसे जुन्या खात्यातच पडून राहायचे. आता 'ऑटो मोड'मुळे निवृत्तीच्या वेळी मिळणारी रक्कम विनासायास एकत्रित उपलब्ध होईल. एकूणच, डिजिटल इंडियाच्या दिशेने ईपीएफओचे हे पाऊल कर्मचाऱ्यांसाठी 'ईज ऑफ लिव्हिंग' वाढवणारे ठरेल. जर तुम्हीही नोकरी बदलण्याच्या विचारात तुमचा युएएन आणि आधार लिंक असल्याची खात्री करा, बाकी काम ईपीएफओची ही नवीन सिस्टीम करेल.


जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स | ब्रेक न्यूज | ज

## बापसई फाट्यावर भरधाव वाहनाखाली बिबट्याचा मृत्यू

### अंधार आणि सुरक्षेचा अभाव ठरला कारणीभूत

जन सम्राट टाईम्स

**कल्याण | प्रतिनिधी :** कल्याण तालुक्यातील मुरबाड-नगर महामार्गावर बापसई फाट्याजवळ रविवारी रात्री घडलेल्या भीषण अपघातात एका बिबट्याचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रात्री सुमारे दहा ते साडेदहाच्या दरम्यान पेट्रोल पंपाजवळ रस्ता ओलांडत असताना भरधाव वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत हा दुर्दैवी प्रकार घडला. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. अपघाताचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.प्राथमिक माहितीनुसार, महामार्गावर वेगाने धावणाऱ्या वाहनचालकाला अंधारामुळे रस्ता ओलांडणारा बिबट्या दिसला नाही. त्यामुळे अचानक झालेल्या धडकेत बिबट्याने घटनास्थळीच प्राण सोडले. धडकेची तीव्रता इतकी होती की बचावाची कोणतीही संधीच मिळाली नाही. या परिसरात जंगलाचा पट्टा लागून असल्याने बिबट्यांचा वावर नवीन नाही, असे स्थानिकांनी सांगितले. मात्र, अशा संवेदनशील भागात योग्य प्रकाशयोजना, इशारा फलक किंवा वेगमर्यादा नियंत्रण नसल्याने वारंवार वन्यजीव अपघाताला बळी पडत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. “प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वन्यजीवांचे जीव धोक्यात येत आहेत,” घटनेची माहिती मिळताच वनविभाग आणि स्थानिक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मृत बिबट्याचा पंचनामा करण्यात येत असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.




### उपाययोजनांची गरज

तज्ज्ञांच्या मते, अशा घटना टाळण्यासाठी पुढील उपाय आवश्यक आहेत:वन्यजीव मार्ग (wildlife corridors) निश्चित करणे वेगमर्यादा कठोरपणे अंमलात आणणे सीसीटीव्ही व सेन्सर अलर्ट सिस्टम बसवणे प्रकाशयोजना व चेतावणी फलक वाढवणे या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी सर्वसामान्यांची मागणी आहे.

## अवघ्या ७ वर्षांच्या ईशांक सिंहने पोहून पार केली 'पाल्क सामुद्रधुनी'

जन सम्राट टाईम्स



**चेन्नई |** झारखंडची राजधानी रांची येथील अवघ्या ७ वर्षीय ईशांक सिंह याने एक ऐतिहासिक आणि थक्क करणारा विक्रम आपल्या नावे केला आहे. ईशांकने भारत आणि श्रीलंका यांच्या दरम्यान असलेली अत्यंत आव्हानात्मक 'पाल्क सामुद्रधुनी' सलग पोहून पार करण्याचा नवा विश्वविक्रम रचला आहे. या चिमुकल्याने ९ तास आणि ५० मिनिटांत तब्बल २९ किलोमीटरचे अंतर समुद्रात पोहून पूर्ण केले आहे. ईशांकने ३० एप्रिल २०२६ रोजी ही अत्यंत कठीण मोहीम फत्ते केली. त्याने श्रीलंकेतील तलाईमन्नार येथून पहाटे ४ वाजता पोहण्यास सुरुवात केली आणि दुपारी १:५० वाजता तो भारतातील तामिळनाडू येथील धनुषकोडी च्या किनाऱ्यावर यशस्वीरीत्या पोहोचला. पाल्क सामुद्रधुनीचा हा मार्ग जगातील सर्वात खडतर जलतरण मार्गांपैकी एक मानला जातो. समुद्रातील पाण्याचा वेगवान प्रवाह, धोकादायक सागरी लाटा आणि हवामानातील अनपेक्षित बदल यामुळे येथे पोहणे अत्यंत आव्हानात्मक असते. परंतु, ७ वर्षांच्या ईशांकने या सर्व अडचणींवर मात केली. ईशांकच्या या असामान्य कामगिरीची दखल घेत 'युनिव्हर्सल रेकॉर्ड्स फोरम' ने त्याला 'सर्वात तरुण आणि सर्वात वेगवान पाल्क सामुद्रधुनी जलतरणपटू' म्हणून अधिकृतपणे घोषित केले आहे.

## जळगाव एमआयडीसीत भीषण आग

### सिलिंडरच्या स्फोटांनी परिसर हादरला, अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न

जन सम्राट टाईम्स

**जळगाव ।** शहरातील एमआयडीसी परिसरात आज एका चटई बनविणाऱ्या कंपनीला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या आगीने पाहता पाहता रौद्ररूप धारण केले असून, आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट लांबूनच दिसून येत आहेत. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव एमआयडीसीतील ‘जे’ सेक्टरमध्ये असलेल्या एका चटई कंपनीला अचानक आग लागली. या आगीत कंपनीतील ज्वालाग्राही साहित्यामुळे आग वेगाने पसरली. आगीची तीव्रता इतकी भीषण होती की, कंपनीत असलेल्या गॅस सिलिंडरचे एकामागून एक तब्बल चार स्फोट झाले. या स्फोटांच्या आवाजा मुळे संपूर्ण परिसर हादरून गेला असून स्थानिक नागरिक आणि इतर कामगारांमध्ये भीतीचे प्रचंड वातावरण निर्माण झाले आहे. आगीने रौद्ररूप धारण केल्यामुळे ही आग आता शेजारील ठिबक सिंचन साहित्य तयार करणाऱ्या कंपनीपर्यंत पोहोचली आहे. यामुळे शेजारील उद्योगांनाही मोठा धोका निर्माण झाला आहे. आगीमुळे परिसरात धुराचे काळे लोट पसरले असून श्वास घेण्यासही त्रास होत आहे. घटनेची माहिती



मिळताच अग्निशमन दलाचे दोन बंब तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मात्र, आगीचा विस्तार मोठा असल्याने हे बंब अपुरे पडत असल्याचे चित्र आहे. अग्निशमन दलाच्या गाड्यांमधील पाणी संपताच आगीने पुन्हा एकदा उचल खाल्ली, ज्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी महापालिकेसह इतर ठिकाणांहून अधिक मदतीची मागणी करण्यात आली आहे. आज शनिवार असल्यामुळे कामगारांना सुट्टी असल्यामुळे जीवित हानी टळली आहे. ही आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असावी असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत असला तरी, अधिकृत तपासाअंतीच नेमकी माहिती समोर येईल. सध्या प्रशासनाचे आणि अग्निशमन दलाचे मुख्य लक्ष आग अधिक पसरू न देता ती पूर्णपणे विझवण्यावर आहे. या घटनेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त अद्याप मिळालेले नाही.


## मांडा–टिटवाळ्यात हिंदू संमेलन उत्साहात

### परंपरा जपण्याचा संदेश; “इतिहास विसरू नका, सजग राहा” – यशोदाताई पाटील यांचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**मांडा–टिटवाळा|** मांडा–टिटवाळा (पूर्व) येथील विद्यामंदिर शाळा प्रांगणात आयोजित हिंदू संमेलन उत्साहात आणि मोठ्या प्रतिसादात पार पडले. विविध घटकांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या संमेलनात प्रमुख वक्त्या म्हणून यशोदाताई पाटील आणि हर्षदाताई केणे यांनी बदलत्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य केले. “आपल्या हिंदू परंपरेचा आणि महापुरुषांच्या इतिहासाचा विसर



पडू देऊ नका,” असे आवाहन करत त्यांनी समाजातील जागरूकतेवर भर दिला. विशेषतः मुलींना लक्ष्य करून होणाऱ्या फसवणुकीच्या प्रकारांबाबत त्यांनी चिंता व्यक्त करत सावध राहण्याचे आवाहन केले. महापुरुषांच्या कार्याची उजळणी वक्त्यांनी हिंदू संस्कृतीची महानता अधोरेखित करत इतिहासातील पराक्रमी व्यक्तिमत्त्वांची उदाहरणे दिली. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महाराणा प्रताप, अहिल्याबाई होळकर, ताराराणी आणि येसूबाई यांच्या बलिदानाची आठवण करून देत त्यांनी उपस्थितांना प्रेरित केले.

समाजातील एकजुटीवर भर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राहुल मिश्रा यांनी आपल्या भाषणात समाजातील एकोप्याचे महत्त्व अधोरेखित केले. “नागरिक आणि व्यापाऱ्यांनी एकमेकांना सहकार्य केल्यास समाज अधिक सक्षम होईल,” असे त्यांनी सांगितले. शिस्तबद्ध आयोजन, प्रेरणादायी वातावरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन देवसर यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या संमेलनाच्या माध्यमातून समाजात जागरूकता, सांस्कृतिक अभिमान आणि परस्पर सहकार्याची भावना दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## कानळदा रस्त्यावर मोठी भेग; संतप्त नागरिकांचा रस्ता रोको

### ठेकेदार व अधिकाऱ्यांविरोधात संताप; प्रशासनावर ताशेरे



जन सम्राट टाईम्स

**जळगाव |** जळगाव शहरातील कानळदा रोडवर समर्थ लॉन परिसरात रस्त्यावर मोठी भेग पडल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या भेगेमुळे वारंवार अपघात होत असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना पसरली आहे. या पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित ठेकेदाराविरोधात थेट रस्ता रोको आंदोलन करत निषेध नोंदवला.

स्थानिकांच्या माहितीनुसार, रस्त्याच्या मध्यभागी पडलेली ही भेग दिवसेंदिवस अधिकच मोठी होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी ही भेग दिसून न आल्याने वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होत आहे. अनेक दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनधारकांना अपघाताचा सामना करावा लागला असून, काही जण जखमीही झाले आहेत. त्यामुळे तात्काळ दुरुस्तीची मागणी जोर धरू लागली आहे.

आंदोलनादरम्यान नागरिकांनी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत ठेकेदाराच्या निष्काळजीपणावर आणि अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. “लहानशी दुरुस्ती वेळेत केली असती, तर आज ही परिस्थिती निर्माण झाली नसती,” अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. दरम्यान, या आंदोलनाची माहिती मिळताच स्थानिक आमदार राजूमामा भोळे यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यांनी नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन दिले. तसेच रस्त्याची त्वरित दुरुस्ती करून नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या घटनेमुळे शहरातील रस्त्यांच्या निकृष्ट दर्जाच्या कामांबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### दोन वर्षांत 10 मृत्यू, 500हून अधिक अपघात;

कानळदा येथील नादुरुस्त सिमेंट रस्त्यामुळे आणखी एक जीव गमवावा लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कांचन नगर येथील अक्षय संजय देशमुख (वय ३६) यांचा दुचाकी अपघातात मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. शुक्रवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास ही घटना घडली. अपघातानंतर दोघेही जखमी अवस्थेत बराच वेळ रस्त्यावरच पडून होते. या रस्त्यामुळे गेल्या दोन वर्षांत तब्बल १० जणांचा मृत्यू झाला असून ५००हून अधिक अपघातांची नोंद झाली आहे. संतप्त नागरिकांनी शनिवारी दीड तास रास्तारोको आंदोलन करत प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. दरम्यान, ठेकेदाराने तात्पुरती डागडुजी केली असून नागरिकांनी कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी केली आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स | अँकर न्यूज | ज

## नशिराबादमध्ये ‘बुद्धम् शरणम् गच्छामि’चा जयघोष; भव्य कॅन्डल मार्चने उजळली नगरी

### धम्मपूजा, उपदेश आणि शिस्तबद्ध मिरवणुकीतून गौतम बुद्ध जयंती उत्साहात साजरी

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद :** नशिराबाद येथे बौद्ध पंच मंडळाच्या वतीने गौतम बुद्ध यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. ‘बुद्धम् शरणम् गच्छामि’च्या जयघोषात पार पडलेल्या या सोहळ्यात भव्य कॅन्डल मार्च, धम्मपूजा आणि विविध धार्मिक कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर बुद्धमय झाला होता.

**धम्मपूजेसह मंगल सुरुवात**

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता बौद्ध धर्मगुरू भंतेजी अभिचित्त थेरो यांच्या हस्ते धम्म



त्रिसूत्र पठण आणि धम्मपूजेद्वारे झाली. यावेळी धम्मध्वजाचे पूजन करण्यात आले. शांत आणि आध्यात्मिक वातावरणात उपासकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदवला. दुपारच्या सत्रात सामूहिक भोजनदानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी बुद्धाचार्य तुषार रंधे यांनी उपस्थितांना धम्माचे महत्त्व आणि गौतम बुद्ध यांच्या शिकवणींचा सामाजिक जीवनावर होणारा प्रभाव याविषयी मार्गदर्शन केले.

**कॅन्डल मार्चने वेधले सर्वांचे लक्ष**

संध्याकाळी आयोजित भव्य कॅन्डल मार्च हा या सोहळ्याचा मुख्य आकर्षण ठरला. पांढऱ्या शुभ्र वेशात सजलेले उपासक-उपासिका हातात पेटत्या मेणबत्त्या घेऊन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणुकीत सहभागी झाले होते. भवानीनगर येथील तथागत बुद्ध विहारापासून या मिरवणुकीला प्रारंभ झाला. जयंती समितीचे अध्यक्ष अभय सपकाळे यांच्या हस्ते गौतम बुद्ध तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

**विश्वशांती बुद्ध विहारात समारोप**

‘बुद्धम् शरणम् गच्छामि’च्या घोषणांनी आणि पुष्पवृष्टीत निघालेली ही मिरवणूक मुक्तेश्वर नगर येथील विश्वशांती बुद्ध विहारात पोहोचली. तेथे बौद्ध समाजाचे अध्यक्ष विनोद रंधे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता शांततेच्या संदेशासह करण्यात आली.

मोठ्या संख्येने उपस्थिती या सोहळ्याचे सूत्रसंचालन सतीश सावळे यांनी केले, तर आनंदा रंधे यांनी उपस्थितांचे आभार मानले. नशिराबाद आणि परिसरातील बौद्ध बांधव, भगिनी व उपासक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या भव्य आयोजनातून गौतम बुद्ध यांच्या शांतता, करुणा आणि समतेच्या संदेशाचा जागर झाला असून, समाजात बंधुता आणि एकात्मतेचा भाव दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला.